# वर्ष 2015-16

Page No.
Date:

## नोटीस

राष्ट्रीय सेवायोजना विभागातील सर्व सभासदांना सुचित करण्यात येते कि शैक्षणिक वर्ष 2015-16 या वर्षातील विभागाची मिटींग दि. 19/6/2015 रोजी ठिक 11:30 ला राष्ट्रीय सेवायोजना विभागात आयोजीत केली आहे. तरी सर्वांनी उपस्थित रहावे.

प्रा. जे. ए. कांबळे - Kamble
प्रा. के. एच. राक्षसे [signature]
प्रा. एस. एस. सुर्यवंशी [signature]
प्रा. के. बी. पाटो [signature]
प्रा. सौ. पी. एस. चव्हाण [signature]

दत्तक गांव - पोहाळे ता. पन्हाळा जिल्हा कोल्हापूर

वर्षे. 2015-16, 2016-17, 2017-18, 2018-19

Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale (Arts, Commerce & Science) Estd. June 2000

Scanned by CamScanner

मिटींग

सन 2015-16 या शैक्षणिक वर्षातील राष्ट्रीय सेवायोजना विभागाची मिटींग दि. 19/6/2015 रोजी राष्ट्रीयसेवा योजना विभागात पार पडली या सभेस समितीतील सर्व सदस्य उपस्थित होते.

प्रा. जे. ए. कांबळे
प्रा. के. एन. राक्षसे
प्रा. एन. एन. सुर्यवंशी
प्रा. सौ. पी. एल. चव्हाण
प्रा. के. बी. पाटे

वरील प्रमाणे कोरम पुर्ण झाल्यानंतर सभेच्या प्रत्यक्ष कामकाजास सुरुवात करण्यात आली.

विषय 1 मागील सभेचे प्रोसिंडिंग वाचून कायम करणे

ठराव :- मागील सभेचे इतिवृत्त समिती प्रमुखांनी वाचून दाखविले ते योग्य आणि बरोबर असल्याने त्यास ही सभा मंजूरी देत आहे.

सुचक प्रा. के. एन. राक्षसे
अनुमोदक प्रा. के. बी. पाटे

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय:2. नविन स्वयंसेवक ~~मंजूर करणे~~ नोंदणी करणे

ठराव: सन 2015-16 या शैक्षणिक वर्षातील राष्ट्रीय सेवायोजना समिती साठी नविन स्वयंसेवक नोंदणी करणे आवश्यक आहे त्याच प्रमाणे विद्यापीठ नियमाने त्यांना शुल्क आकारणे आवश्यक आहे. असे ही सभा ठराव घेत आहे.

सुचक: प्रा. एन. एन. सुर्यवंशी
अनुमोदक: प्रा. सौ. पी. एल. चव्हाण

विषय: 3 या वर्षी महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करणे

ठराव : - या वर्षी महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण करुन ते जगविण्याचा प्रयत्न करणे.

सुचक - प्रा. जे. ए. कांबळे
अनुमोदक - डॉ. एन. जी. भुतूरे

Page No.
Date : 0?/10/2015

Estd.
June 2000

## नोटीस

राष्ट्रीय सेवायोजना विभागातील सर्व सभासदांना कळविण्यात येते कि 12/10/2015 रोजी सकाळी ठिक 10:30 वा एन. एस. एस. विभागात मिटींगचे आयोजन केले आहे. तरी सर्व सदस्यांनी उपस्थित रहावे.

प्रा. जे. ए. कांबळे Kamble
प्रा. के. एन. राक्षसे
प्रा. एस. एस. सुर्यवंशी
प्रा. सौ. पी. एल. चव्हाण

Scanned by CamScanner




राष्ट्रीय सेवायोजनेचे विशेष श्रम संस्कार शिबिर मौजे पोहाळे तर्फ बोरगाव मध्ये उद्घाटन करतांना मा.श्री. विठ्ठल पाटील . डॉ. अध्यक्ष स्वागत प्रकाश [illegible]



विशेष श्रम संस्कार शिबिर पोहाळे मध्ये मनोगत व्यक्त करतांना कार्यक्रमाधिकारी प्रा. रोहित कांबळे, ग्रामस्थ विद्यार्थी।

Scanned by CamScanner

Page No.
Date :

- मिटींग -

सन 2015-16 या शैक्षणिक वर्षातील राष्ट्रीय सेवा योजना विभागात दि. 12.10.15 रोजी मिटींग घेण्यात आली. या सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

प्रा. जे. ए. कांबळे
प्रा. एन.एन. सुर्यवंशी
प्रा. के. एल राक्षसे
प्रा. के. बी. पाटो
प्रा. सौ. पी. एल. चव्हाण

वरील प्रमाणे कोरमपूर्ण झाल्यानंतर सभेच्या प्रत्यक्ष कामकाजास सुरुवात करण्यात आली.

विषय: 1) मागील सभेचे प्रोसिडिंग वाचुन कायम करणे.
ठराव :- मागील सभेचे इतिवृत्त समिती प्रमुखांनी वाचुन दाखविले ते योग्य आणि बरोबर असल्याने त्यास ही सभा मंजूरी देत आहे.

सुचक : प्रा. पाटो के. बी.
अनुमोदक : प्रा. सुर्यवंशी एन.एन.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय :- नविन स्वयंसेवक नोंदणी झाली त्यातील काही व जूने स्वयंसेवक यातील 50 विद्यार्थ्यांची निवासी शिबीरा साठी निवड करणे.

ठराव :- या वर्षी नोंदणी केलेल्या स्वयंसेवकां मधील 50% विद्यार्थी त्याच प्रमाणे मागील वर्षातील 50% विद्यार्थ्यांतील स्वयंसेवकांना निवासी शिबीरात घेऊन जावे. व निवासी शिबीर शक्यतो दिवाळीच्या नंतर ठेवण्यात येईल, असा ठराव ही सभा घेत आहे. विशेष शिबीर पोहळे येथे घेण्यात यावे असा ठराव मंजूर झाला.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सुचक प्रा. जे. ए. कांबळे
अनुमोदक प्रा. सौ. चव्हाण पी. एल.

Scanned by CamScanner

## राष्ट्रीय सेवा योजना २०१५-१६ अहवाल

यावर्षी सन २०१५-१६ राष्ट्रीय सेवा योजना विभागात नियमित कार्यक्रमा अंतर्गत रस्त्याचे काम, महाविद्यालय परिसर स्वच्छता करण्यात आली. त्याच प्रमाणे पंचायत समिती पन्हाळा व ग्रामपंचायत कळे यांच्या अवाहनानुसार रा.से. यो. विद्यार्थ्यांनी ग्रामस्वच्छता अभियानात सहभाग घेतला. ग्रामस्वच्छता दुताची नेमणूक केली. तसेच त्यांनी घेतलेल्या एकदिवसीय आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेत विद्यार्थ्यासह सहभाग नोंदविला.

या वर्षी राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबीर मौजे पोहाळे तर्फ बोरगांव, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर येथे घेण्यात आले. या कार्यक्रमात २३ विद्यार्थीनी व २७ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. या गावात निवासी राहून सात दिवसांचे श्रमदान, प्रबोधन करण्यात आले. दि. १८/२/२०१६ रोजी सकाळी ११.४० ला उद्घानाचा कार्यक्रम घेण्यात आला. त्यानंतर ग्रामस्थांशी विविध विषयावर चर्चा करण्यात आली. १९/२/२०१६ ला सकाळी गावातील गटारी काढण्यात आल्या, विद्यार्थीनींनी गावातील सर्व रस्ते झाडूने स्वच्छ केली. त्याच प्रमाणे संध्याकाळी ६.३० ला शिवाजी महाराज जयंती निमीत्य प्रा. सुरेश शिखरे, छत्रपती शहाजी कॉलेज, कोल्हापूर यांचे व्याख्यान ठेवले होते. या कार्यक्रमासाठी गावातील बरेचसे ग्रामस्थ उपस्थित होते. २०/२/१६ सकाळी श्रमदान करताना गटारीतील काढलेली घाण ट्रॅक्टरमध्ये भरुन गावाबाहेर नेऊन टाकण्यात आली. काही विद्यार्थ्यांनी गटारी तुंबलेल्या होत्या त्या उघडून मोकळ्या केल्या. गटारी नसलेल्या ठिकाणी विद्यार्थ्यांनी नवीन गटारी खोदल्या. त्याचप्रमाणे विद्यार्थीनींनी काढलेली घाण भरुन देण्यात मदत केली. दिनांक

२१/२/२०१६ ला काही विद्यार्थ्यांनी गावात नसलेल्या ठिकाणी गटारी खोदण्याचे काम केले. याच दिवशी रक्तदान शिबीर घेण्यात आले. या शिबीरात गावातील काही ग्रामस्थ व स्वयंसेवक यांच्या वतीने रक्तदान करण्यात आले. डोळे तपासणी शिबीराला विशेष प्रतिसाद मिळाला नाही. सायंकाळी ६.३० ला प्रा. कमलाकर राक्षसे, विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे यांचे युवकांमध्ये संविधान मुल्यांची गरज या विषयावर व्याख्यान झाले. या कार्यक्रमासाठी मोठ्या प्रमाणात ग्रामस्थ व स्वयंसेवक उपस्थित होते.

दि. २२/२/२०१६ रोजी सकाळी श्रमदान करण्यात आले. सायंकाळी स्वयंसेवक व ग्रामस्थांसाठी अंधश्रध्दा निर्मुलन काळाची गरज या विषयावर श्री. कृष्णा कोरे आणि श्री. संघसेन जगतकर (कामगार कल्याण अधिकारी, कोल्हापूर) यांचे प्रयोगावर आधारीत अंधश्रध्दा निर्मुलनाविषयी प्रबोधन करण्यात आले. त्याचप्रमाणे दि. २३/२/२०१६ रोजी सकाळी श्रमदान घेण्यात आले. त्याचबरोबर रात्री स्वयंसेवकांद्वारे विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम घेऊन ग्रामस्थांचे मनोरंजन करण्यात आले. दि. २४/२/२०१६ हळदी कुंकवाचा कार्यक्रम घेण्यात आला. त्यात सर्व स्वयंसेविका सहभागी होत्या. दुपारच्या सत्रात सर्व ग्रामस्थांनी विशेष समारंभ घेऊन आम्हा सर्वांना निरोप दिला. अशाप्रकारे सात दिवसांच्या निवासी शिबीरात उपक्रम राबविले.

कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे
(कला, वाणिज्य व विज्ञान)

Scanned by CamScanner

Page No.
Date :   /  /



# पाटील महाविद्यालयाचे पाटपन्हाळ्यात शिबिर

सकाळ वृत्तसेवा

बाजारभोगाव, ता. १८ : युवकांनी सकारात्मक दृष्टिकोनातून निःस्वार्थीपणे योगदान दिल्यास समाज व्यवस्था अधिक सक्षम बनेल, असा विश्वास कुंभी कासारी साखर कारखान्याचे संचालक प्रकाश पाटील (पाटपन्हाळा) यांनी व्यक्त केला. कळे (ता. पन्हाळा) येथील विठ्ठलराव पाटील महाविद्यालयाच्या श्रमसंस्कार शिबिरात ते बोलत होते. उद्घाटन जिल्हा परिषद सदस्या संगीता पाटील व कुंभी कासारीचे संचालक पी. डी. पाटील यांच्या हस्ते झाले. पोहाळेच्या सरपंच रेखाताई पाटील अध्यक्षस्थानी होत्या.

शिबिरादरम्यान गावातील सर्वच गल्ल्या, पाणंदी, गटारी, सार्वजनिक ठिकाणे, पाणवठे यांची स्वच्छता करण्यात आली. ग्रामस्थ, विद्यार्थ्यांसाठी शिवाजी महाराजांचे कार्यकर्तृत्व आणि आजचा युवक (प्रा. सुरेश शिखरे), अंधश्रद्धा विनाशाय (प्रा. जे. एस. जाधव), अंधश्रद्धा निर्मूलन : काळाची गरज (कृष्णा कोरे) यांची व्याख्याने झाली. व्यक्तिमत्त्व विकास, शाश्वत व सर्वांगीण ग्रामीण विकास, महिला सबलीकरण, रस्ते निर्मिती व सुशोभीकरण आदी उपक्रम राबविण्यात आले. या वेळी संस्थाध्यक्ष विठ्ठल पाटील, उपसरपंच सरदार पाटील, राजाराम जाधव, सविता पाटील, प्राचार्य एम. जे. जाधव, बी. आर. पाटील, बी. डी पाटील, राजाराम जाधव, जयश्री माळवी, सविता पाटील, माधुरी जाधव, दत्तात्रय पाटील, दत्तात्रय गुरव उपस्थित होते. प्रा. डॉ. मधुकर घत्तुरे, प्रा. प्रेरणा चव्हाण यांनी परिश्रम घेतले.

सकाळ
कोल्हापूर, शनिवार, १९ मार्च २०१६
५

Vitthalrao Patil Mahavidyalaya, Kale (Arts, Commerce & Science) Estd. June 2000 Tal. Panhala Dist. Kolhapur